३५२
काव्य ते. जोशी . काळे, कृष्ण ३५२
१९४६३
REFBK-0019463
REFBK-0019463

कै. ति. रा. गणेश वासुदेव जोशी

उर्फ

काका यांच्या स्मरणार्थ

सार्वजनिक

# मेळ्याची पद्यावली.

पद १ लें—चाल—( सुनो सुनोजी मेरे यार )

ध्या प्रभो झणीं अवतार, असुरांसि संव्हाराया ॥ धृ. ॥

दुनियेचे पालनवाले, भक्तांचे चालनवाले, दुष्टांचे कर्दन काळ,
हरि उठा उठा या समया ॥ १ ॥

भारती संकृती बुडली, व्यामोहे गुंगुनि गेली, असुरांची सत्ता आज,
बैसली धर्म बुडवाया ॥ २ ॥

पाखांडि मतांची चलती, ही अधोगतीची बढती, तव भक्त
माजले फार या झणी प्रभो या समया ॥ ३ ॥

कुरू क्षेत्रा वरले गीत, कोणी न आजला गात, जाहली कलीची
मात, कशि झोंप घेतां सदया ॥ ४ ॥

ही भारत माता गाय, जाहली आज निःसहाय, होतसे, हिचा
संहार, गोपाळ नाम तुजवाया ॥ ५ ॥

प्रळयाची वेळा आली, हरि धांवा संकट काळीं, ही योग्य वेळ
तुम्हाला, अवतार झडकरी ध्यावा ॥ ६ ॥

हे प्रभो वाजवा मुरली, जी मधूर गीता स्फुरली, तो पुनरपि
घूमवा नाद स्वांतत्र्य कलश उघडाया ॥ ७ ॥

पद २रें—चाल— ( तूं टांक चिरुनी मान )

हें ब्युराक्रसी सरकार, धोरणी फार
गोड बोलुनि स्वैर चालवी, चहूंकडे अधिकार ॥ धृ. ॥
चिरडिले कायद्याखालीं ।
राक्षसी हौस पुरविली ।
ही दडपशाही दंडेली
शिक्षा सत्रा मधें बया ही किती बळी घेणार ॥ १ ॥
पोटाशि घेत जा चिमटा ।
घ्या करीं भिक्षेचा लोटा ।
कायदा आमुचा सोटा ।
शिरजोरपणानें पुन्हां बोलती न्याय आम्हीं देणार ॥ २ ॥
थोतांड कायदा सोंग ।
वरकांति सर्व हे ढोंग ।
आंतले निराळे रंग ।
म्हणुनी कायदे भंग करोनी, तिला करा बेजार ॥ ३ ॥
अन्यायी कायदे मोडा ।
बंधुनों श्वानपणसोडा ।
हे भूत दुहींचे गाडा ।
मग काय उणे हो, स्वराज्यदिनकर पळविल अंधःकार ॥ ४ ॥

पद ३ रें—चाल—(: भगवान भुवनकल्याण)

स्वातंत्र्य मिळविण्याला, बोध हा घ्यावा ॥ धृ. ॥
स्वराज्यार्थ तुम्हीं, शिवरायाचा, डाव ओळखावा ॥ १ ॥
उठा बंधुनों, आळस सारा , झाडुनि टाकावा ॥ २ ॥
कार्यारंभी स्वयंस्फूर्तीचा, प्रसाद मागावा ॥ ३ ॥
जशास तैसे, योग्य वागणे, न्याय घ्यानीं ठेवा ॥ ४ ॥
स्वराज्यार्थ तुम्हीं, स्वार्थ पसारा, पाशाचि तोडावा ॥ ५ ॥
एक विचारे, स्वराज्य पाया, भक्कम बांधावा ॥ ६ ॥
मायभूमिचे ऋण दिल्या विण देह न ठेवावा ॥ ७ ॥
सांप्रत काली रहस्य गीता धडा पुढें ठेवा ॥ ८ ॥
श्री टिळकांचा स्वराज्य गाडा पुढें चालवावा ॥ ९ ॥

पद ४ थें–( चाल—जादुगार )

तुमचे ढंग कधी सरणार हो, सावध कधिं होणार ॥ धृ॰ ॥
पाश्चात्यांच्या, अनुकरणाची, चटक लागली तुम्हांला
अधोगतीच्या, पायावरचा, वाडा किती टिकणार ॥ १ ॥
नसे टिकाऊ, आज कालची, दिखाऊ सारी सुधारणा
ठरे अनुभवें, तरि तीच्या कां, मोहा बळी पडणार ॥ २ ॥
विलायतेमाधें काय चालले, डोळे उघडुनी नीट पहा
नीति देवता, विषय सुखास्तव, केली तयानी ठार ॥ ३ ॥
मर्यादेचा दाब उडाला, रान मोकळे हो झाले
हित परिणामी, स्थिति नसे ही रसातळा जाणार ॥ ४ ॥

स्वसुख लालसे, पायीं त्यांना, आठवण नाहीं शीलाची
कुणी कुणाचा, मान ठेविना, चोहोंकडे अंधार ॥ ५ ॥
भीक नको पण आवर कुत्रा, पाश्चात्यांचीं होय स्थिती
सुधारणेनें, त्यांना केले, संसारी बेजार ॥ ६ ॥
आज तयानां, कळूं लागले, आर्य संकृती उच्च किती
परंतु तुम्हीं, मुर्ख करितसा, आज तिचा धिःकार ॥ ७ ॥
तत्व खरें हें पिकते जेंथें नाहीं विकले जात तिथें
म्हणुनि तयांना, तुमची संकृती, आज होतसें प्यार ॥ ८ ॥
मर्यादेच्या बाहेर गेले तुमचे वर्तन या समयीं
नडेल कैसे, हेचि कळेना, म्हणुनी वागता स्वैर ॥ ९ ॥
अधिसुवास वर्तत आपुले समाज बंधन पाळावे
कोण तुम्हां मग ठेविल नांवें छाती नाहीं होणार ॥ १० ॥
उघड उघड जे गैर दिसते टिका करितो सहज कुणी
परंतु वर्तन सुधारवेना उलट शिव्या भडिमार ॥ ११ ॥
सभा भरवितां निषेध करिता तेल ओतितां आगींत
त्या योगें हा समाजरुपी किल्ला ढासळणार. ॥ १२ ॥

पद ५ वें.–( **चाल**—शुभ वेळ मंगला आज. )

अविनाश पुढें दिसतां, अजुनि उमजाना ॥ धृ० ॥
आर्य संस्कृति, लाथाडून तुम्हीं, स्वैर वागताना ॥ १ ॥
नटुनि सजुनी, मोहक बनणें, लज्जास्पद जाणा ॥ २ ॥
थाट नाटकी, योग्य शोभतो, वारयोषितांना ॥ ३ ॥
अधोगतीचो, कमान चढती, डोळे उघडाना ॥ ४ ॥

दा. क्र. १०८४३

सती द्रौपदी, अनुसूयादिक, कुठे साध्वी ललना ॥ ५ ॥
अहिल्या तारा, सावित्रीची, गोड कथा श्रवणा ॥ ६ ॥
साध्वी स्त्रियांच्या, पावित्र्याच्या, करा सुधापाना ॥ ७ ॥
धार्मिक बंधन, शिथील पडतां, ढंग सुचती नाना ॥ ८ ॥
मायभूमिच्या, भावि पिढीच्या, तुम्हीच माताना ॥ ९ ॥
जबाबदारी, ओळखून द्या, शिक्षण बालाना ॥ १० ॥
जागृति ठेवा, मातृपदाची, तुम्हीं वागताना ॥ ११ ॥

पद ६ वें–**चाल**––( असा मोहरा झाला नाहीं )

बलवंताच्या राष्ट्रीय पक्षा उठाउठा आतां
काकुळतिनें हाक मारितो भारत भूमाता ॥ धृ० ॥
निराशतेचा फत्तर फोडून मार्ग सुधारावा
ध्येय गांठण्या **श्रीटिळकांचा** बोध मनीं ठसवा ॥ १ ॥
परावलंबन हुताशनीवर ध्या ठोकुनी बोंब
चैत्र पालवी स्वराज्य तरुला फुटती नव कोंब ॥ २ ॥
आजुबाजुचे निवडुंगाचें खची करा रान
त्या जागेवर एकजुटीची बाग करा छान ॥ ३ ॥
बागे मोजी लोकशाहिची आम्रतरु लावा
स्वराज्य फळाचा रसस्वाद मग मधूर चाखावा ॥ ४ ॥

पद ७ वें–( **चाल**—ध्या प्रभो झणी अवतार )

ही भारत भू माता ॥ विनविते हरि पदकमला ॥ धृ० ॥
कलिं युगी मातले दैत्य ॥ तें असत्य ठरते सत्य
सोसवना आतां भार ॥ कशी नये दया हरि तुजला ॥ १ ॥

आजवरी ऐकिल्या गोष्टी ॥ धावलासी भक्ता साठीं
मग :आज केली कां खोटी ॥ कुणी वाली नुरे धर्माला ॥ २ ॥
घडतसे धेनु संव्हार ॥ साधू संत छळ अनिवार
घेईना कुणी :कैवार ॥ हरि झोंप कशीं ये तुजला ॥ ३ ॥
सोडुनी देती चोराशी ॥ लटकती :फाशि संन्यासी
होतसे धनी चपराशी ॥ धत्तुरा मिळे रावाला ॥ ४ ॥
सुग्रास मिळे दैत्यांना ॥ कोंडा न मिळे साधूंना
अंबारी मिळे चोरांना ॥ कुणि विचारि ना नीतीला ॥ ५ ॥
वेश्यांच्या सदनीं बत्ती ॥ सति घरीं जळेना पणती
अवनती घरीं गज झुलती हरि उठा न ध्या निद्रेला ॥ ६ ॥
धर्माची घडी बसवाया ॥ साधूंचे रक्षण व्हाया
ध्या करी सुदर्शन चक्र ॥ घालवा दैन्य गोपाला ! ॥ ७ ॥

पद ८ वें-( चालः—बडव बडव रणढोल. )

नका हो पेढू हट्टास ॥ बंधु हो ॥ नका हो पेढू हट्टास ॥
वादांत शेवटीं नाश ॥ बंधु हो ॥ धृ० ॥
कुणी मवाळ म्हणवी जहाल ॥
कुणी म्हणती श्रेष्ठ कौन्सिल
ना कुणास कोणा मेळ ॥ बंधु हो ॥ १ ॥
नाफेर फेरवाल्यांची लागली झुंज जोराची ॥
शेवटीं आहुति दोघांची ॥ बंधु हो ॥ २ ॥
बोलणें सोडुनी द्यावें । करणेची करोनी जावें
आपुलें ध्येय गाठावें ॥ बंधु हो ॥ ३ ॥

सं.काव्य
६ – ३



मीपणा बाळ कडू द्यावें
अभिमान बीज राखावें
आपुल्या हितीं जागावें ॥ बंधु हो ॥ ४ ॥

पद ९ वे.–( चालः—रण शिंग फुंकिले. )

सांप्रतकाळीं फिरे भारती, काल चक्र उलटें ॥ धृ० ॥
वनराज केसरी, दैवगतीनें, उकीरडा फुंकी,
उमराव थोर, परि आज झेलति, रंकाची थुंकी॥ १ ॥
आज ब्राह्मणा वाणिज वृत्ती कराविशी वाटे
क्षत्रिय मराठे, आज तयांना ब्राह्मण व्हावें वाटे ॥ २ ॥
शेतकऱ्यांनीं शेती टाकूनि मजुरी पत्करिली
कारागिर जन दलालिची त्या दुर्बुद्धी सुचली ॥ ३ ॥
निसर्ग निर्मित, स्वत्रंतेला लाथाडून दिधले
प्रत्येक बाबतींत, स्वत्व गमवुनि परावलंबी बनले ॥ ४ ॥
दळण कांडणा पासुन आमुचें जीवित परस्वाधीन
काडी इकडली तिकडे न करवे दुसऱ्यांचे आधिन ॥ ५ ॥
युवती जनाच्या पेहरावाची आवड पुरुषांना
थाट पुरषी मर्द बनावें आवड ललनांना ॥ ६ ॥
ताकद नाहीं स्त्रैणपणाहा रोम रंध्रिं भरला
म्हणुनि नाटकें खेळ सिनेमा सुचाति या काला ॥ ७ ॥
एका गाली थपड बसता गाल दुजा पुढती
त्राण नसे प्रतिकार कराया म्हणुनी सर्व वेदांती ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८३

हकाल पट्टी करुनि जुन्याची केली नविन भरती
आरोग्य येथील कधिच पळाले व्याधि किती जडती ॥ ९ ॥
स्वातंत्र्य सुधेची पात्रे होती चांदी सोन्याची
तिथें रांग उभि परवशतेची असें खापराची ॥ १० ॥

पद १० वें—चाल—( हाल इकडचे पहावया जगले )

भ्रांती मनाची अजुनि जाइना आशेवर जगते
तो शब्द ऐकला । बाळ बोलला ।भूल मना पडते
आया बाया सांगती ते ते नेम धर्म केले ॥ धृ. ॥
भेट बाळा, जीव वेडा, काकुळतिस आले
हा पाय वाजला । बाळच आला । घडी घडी मी फसेत ॥ १ ॥
वेडी आशा कुजबुजले कुणी लावी कान तिकडे
राजस माझा आला वाटे सुटे न मज कोडे
लोकमान्य हा कर्म योगी हा । पुजिति जन त्यातें ॥ २ ॥
बाळाने मजसाठीं आपुली हाडे झिजविली
तो काळ संपला । बाळ हरपला । सुचेन जिवाते ॥ ३ ॥
किती आठवूं जिवास समजवूं हुर हुर जाइना
बाळ बंधुनों पावन दायक तिलक कथा श्रवणा
ही पुज्य वंद्यनी । रहस्य रमणी । रामशाहिराते ॥ ४ ॥
नव्हति काळजी मला कशाची उणीव ना पडली.

———

॥ श्रीरामसमर्थ ॥

# शिवण-कला मंदीर पुणें.

## आप्पा बळवंत चौक

येथें सर्व प्रकारचे कपडे उत्तम तऱ्हेनें वेळेवर शिवून मिळतील.

**मालक—महादेव बाळकृष्ण बर्वे.**

---

आलेल्या डोळ्यावर रामबाण औषध.

अनुभव घ्या ! खात्री करा !

# एकच ठिकाण.

जी. जी. कुलकर्णी, तूप, लोणी व किराणा दुकान सदाशिव पेठ शनिचा पार, पुणें सिटी.

---

# दि पूना ग्रॅंड टेलरिंग फर्म.

## बुधवार चौक, ढमढेरेचे माडीवर.

या फर्ममध्यें वेळेवर फॅन्सी कपडे शिवून मिळतील. एकवेळ अनुभव अवश्य पाहावा.

मॅनेजर,

कल्लप्पा सत्यप्पा मळ्ळी.

सुप्रसिद्ध पुणें शहरांत
आर. बी. परांजपे यांचा
स्वदेशी पेपरमिंटचा जंगी

# कारखाना.

आमचे कारखान्यांतील पेपरमिंट बरसातचे दिवसांत पाझरण्याची बिलकूल भिती नाहीं. याचा अनुभव, याचा पडताळा आज सतत १२ वर्षें आमचे हजारो गिऱ्हाइकांनीं घेतलाच आहे.

**थोडक्यांत सर्व माहिती.**

**पेपरमिंटः**— श्रीखंड, सुंठ, स्ट्रॉंग, केळें अननस, गुलाब वगैरे सर्व प्रकारचें औषधी, सुवासिक व अर्काचें पेपरमिंट.

**गुलकंदः**— प्रवाळ मिश्र, खडीसाखरेचा ६० तोळ्याचे १ डब्याचे रुपये १—४ टपाल खर्चासह रुपये १—१२.

**मेंन्थॉलार्कः**— लहान बाटली १ डझनचे टपाल खर्चासह रुपये २—१२ मोठी बाटली १ डझनचे टपाल खर्चासह रुपये ५—८.

याशिवाय जंतविनाशक वड्या, लालभडक ओलें कुंकू. शुद्ध केलेलें एरंडेल तेल व औषधी अर्क तयार होतात. सर्व मालाचा क्याटलाग फुकट.

मालक व म्यानेजरः—आर. बी. परांजपे. सदाशिव पेठ, पुणें सिटी.

---

मुद्रक—रामचंद्र बळवंत कुलकर्णी, " भारत प्रिंटिंग वर्क्स "
७५९ कसबा, पुणें शहर.

प्रकाशक—केशव विष्णु जोशी, ८१८ सदाशिव पेठ पुणें.